नियमित फौजदारी खटला क्रं. १५६/२०२१
शासन वि. सुकु उर्फ शिवकुमार
नि.क्र.४५ .

सरकार तर्फे साक्षीदार क्रं. ३

नांव – गणेश राजू कारभारी

वय – ३५ वर्षे, कामधंदा – शेती.

रा. – लोहारा ता. उदगीर

साक्षीदार यांच्या शपथेवर सरतपास सरकारतर्फे अधिवक्ता श्री. ए.एस. कदम यांचेद्वारे शपथेवर सुरुः–

दि २४/०२/२०२१ रोजी दिड वाजता लोहारा येथे माझ्या जुण्या घरी घटणा घडली. आम्ही घरात होते त्यावेळी शिवकुमार सोनटक्के यांच्या आईने हाक मारुन बाहेर बोलावले. त्यावेळी ते माझ्या आईला म्हणाले की, तुमच्या भैयाने आम्हाला गिरणीचावाडा विक्री केला आहे तुम्ही बाहेर निघून जा. त्यावेळी अशी वादावाद झाली शिवकुमार सोनटक्के यांनी लोखंडी पाईपने माझ्या आईच्या हातावर पाईप मारले. मी घटना घडली तेव्हा तीथे होतो. आधी आई समोर गेली ती एकदा आत आली, नंतर मी तीच्या सोबत गेलो. शिवकुमारने मारुन झाल्यावर भागिरथीबाई यांनी माझ्या आईच्या उजव्या हाताच्या अंगठयावर चावा घेतला. मी त्या दोघांना सांगत होतो की, आपण दोघे माणसे गोळा करुन काय असेल तर पाहू. आमच्या चुलत्याने जॉईट सातबराचे घर विकले. आईच्या हातातून तोंडातून रक्त निघाले म्हणून उदगीर पोलीस स्टेशनला आलो. जाणकाबाई व संजय धणूरे हे आम्हाला सोडवायला आले होते. शिवकुमार सोनटक्के यांनी संजय कारभारी यांना फोन केला. आणि गणेश इथे आहे म्हणून सांगीतले. संजय कारभारी हे तेथे

आले व त्यांनी लाथाबुक्यांनी मला मारहाण केली. पोलीस स्टेशनला गेल्या नंतर त्यांनी आम्हाला वैदयकीय तपासणीसाठी पाठविले. आरोपीनी अपराध करताना वापरलेले हत्यारे दाखविले तर ती मी ओळखू शकतो. GMR क्र २२/२०२५ दि. ३०/०६/२०२५ मध्ये पाईप दाखविला, तो तोच आहे. कोर्टासमोर असलेले आरोपी ते तेच आहेत.

**साक्षीदार क्र. ३ चा उलटतपास आरोपी क्र. १ ते ३ तर्फे श्री. पी.एस. बिरादार विधीज्ञ मध्यांत्तराची वेळ झाल्याने तात्पूरता उलटतापास तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2025.07.02 15:15:15 +0530

दिनांक – ०१/०७/२०२५

न्यायदंडाधिकारी प्र.व.
(न्यायालय क्रं. १), उदगीर.

**साक्षीदार क्र. ३ यांचा उलटतपास आरोपी १ ते ३ तर्फे श्री. पी.एस. बिरादार विधीज्ञ यांच्या शपथेवर लटततपास सुरु**

माझे शिक्षण इयत्ता बारावी पर्यंत झालेले आहे. त्यावेळी मी घरामध्ये जेवन करत होतो. हे म्हणणे चुकीचे आहे की, भांडणे होत असताना मी घरात जेवत होतो. हे म्हणणे चुकीचे आहे की, आम्ही पत्रे, नाटी, लोखंडी अॅंगल चोरुन नेले म्हणून भांडणे चालू झाली. हे म्हणणे खरे नाही की, आईने केलेल्या खोटया तक्रारीला आधार देण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे. गट क्र. ४३० मध्ये एक घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, भांडणे

झाले तेव्हा आम्हाला सोडवायाला कोणीही आलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यावर व आईवर चोरीची केस होवू नये म्हणून खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नही की, डोरमल यांचेकडून आलेले घर संजय यांच्या नावे असलेले घर कासनाळे यांना विकले आहे. सुकूकुमार यांनी फोन केल्यावर संजय कारभारी हे तेथे आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, माझ्या आईचे कोर्टात साक्ष चालू असताना मी कोर्टात बसून साक्ष ऐकली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज मी खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2025.07.02 15:15:20 +0530

**दिनांक – ०१/०७/२०२५**

**न्यायदंडाधिकारी प्र.व.**
**(न्यायालय क्रं. १), उदगीर.**